**<u>सं.फौ.खटला क्र. ३३६/२०१७</u>**
**<u>सविता वि. मदन</u>**
**<u>निशाणी क्र. ३७ खाली</u>**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदार क्र. २</u>**

**<u>उलटतपास शपथेवर सुरु -</u>**
**<u>उलटतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. बी. बांते यांच्यामार्फत</u>** :-

७) मी माझ्या कुटुंबासह हिवरा बाजार येथे राहते. माझे पती बॅक ऑफ इंडिया शाखा हिवराबाजार येथे नोकरीला होते. सालई ते हिवराबाजार २ किलो मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बॅकेच्या कामासंबंधी येणाऱ्या बायांना मदत करत असे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती व फिर्यादीचे चांगले संबंध होते व आहे. आमच्या घरी शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतीमध्ये अडचण निर्माण झाल्याने फिर्यादी माझ्या पतीला २०,००० रुपये दिले होते. आमचे गावात दोन घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये आमच्या घराच्या बांधकामाकरीता फिर्यादीने ६०,००० रुपये माझ्या पतीला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पैशाची कमतरता पडल्याने परत फिर्यादीने सन २०१६ मध्ये घराच्या बांधकामाकरीता दिले. सन २०१६ मध्ये माझे पती सेवानिवृत्त झाले हे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्तच्या पैशामधून फिर्यादीला माझे पती १,६०,००० देणार होते.

८) हे म्हणणे खरे नाही की, दि.०५.०१.२०१७ रोजी आरोपी फिर्यादीच्या घरी आले आणि त्यांनी बॅक ऑफ इंडिया शाखा हिवराबाजर धनादेश क्र.००३३५३ रुपये १,६०,०००/- फिर्यादीच्या नावाने लिहून दिला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने तो धनादेश बॅकेत वठविण्याकरीता लावले असता माझ्या पतीच्या खात्यात अपुरेशी रक्कम असल्याने तो परत आला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी आमच्या घरी आली व पैशाची मागणी केली परंतु आम्ही टाळाटाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने फिर्यादीकडून रु.१,६०,०००/- घेतले होते व ते कायदेशीर देणे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, अरुण चौव्हाण यांचा सदर प्रकरणाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अरुण चौव्हाण सोबत घरविक्रीचा करारनामा केला होता.

९) हे म्हणणे खरे नाही की, अरुण चौव्हाण याने माझ्याविरुध्द रजिस्ट्री करुन दिली नाही म्हणून दिवाणी दावा क्र.२६/२०१७ रामटेक न्यायालयात दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, अरुण चौव्हाण याने विक्रीकरारनामानुसार मला ३,००,००० रुपये

दिले. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला फिर्यादीचे पैसे दयायचे नसल्याने आम्ही अरुण चौव्हाणचे नाव खोटे सांगत आहे.

१०) हे मला माहित नाही की, माझे शपथपत्र नि.३७ हे आधीच तयार केले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रात काय नमुद आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,
सही/-

रामटेक.
दिनांक : १२/०३/२०२६.

(डी. सी. वोराणी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कोर्ट नं.२, रामटेक